Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-IV APR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# मराठी आदिवासी कवितेतून व्यक्त होणारे लिंगभाव विषयक तत्वज्ञान

**रमेश ज्ञानोबा शिंदे**
संशोधक विद्यार्थी
पीएच.डी. मराठी
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकूल
(स्वा.रा.ती.म.वि. नांदेड)

मराठी आदिवासी कविता ही प्रामुख्याने १९८० नंतरच्या दशकापासून प्रकर्षाने मराठी साहित्यामध्ये उदयास आली आहे. जन्माने आदिवासी असलेल्या कवी लेखकांनी आदिवासी साहित्याचे दालन अधिकच विस्तृत केले असून, विशेषत: कवितेच्या माध्यमातून समाजजीवन व वास्तवता, त्यांचे लोकतत्वीय महत्व आदिवासी समाजाचा लिंगभाव दृष्टिकोन याविषयी मानवतावादी विचार समोर ठेवून आदिवासी कवी, कवियित्रींनी काव्यलेखन केले. त्यांची कविता आदिवासींच्या संबंध जीवनावर आणि वैशिष्ट्यपूर्ण जगण्यावर भाष्य करते त्याचबरोबर आदिवासी कवी-कवियित्रींनी आपला लिंगभाव, भाषा, संस्कृती, परंपरेच्या माध्यमातून साहित्यात प्रतिबिंबित केला आहे. तद्वतच मराठी आदिवासी कवितेतील लिंगभाव विषयक तत्वज्ञान निदर्शीत करावयाचे झाल्यास आदिवासी कवींच्या काव्य लेखनातून दाखवता येते जसे की, वर उल्लेख केलेल्या दशकातील व त्या अगोदरच्याही नावारूपास आलेले काव्यसंग्रह यात ऊलगुलान, म्होरकी, गोधड, लेखनीच्या तलवारी, रान पाखरांची माय, आदिम जीवनाविष्कार (लेखसंग्रह) तिरकमठा, रान आसवांचे तळे, अभुजमाड, ही वाट तिथून जावी, निवडुंगाला आलेली फुलं आदि अनेक कविता संग्रहातून कवींनी आपल्या व आपला विरूध्दार्थी लिंगभाव प्रकट केलेला आहे. उदाहरण दाखल, मराठी आदिवासी कवितेतून व्यक्त होणारे लिंगभाव विषयक तत्वज्ञान हे काही निवडक कवितेच्या माध्यमातून मांडणार आहे ते पुढील प्रमाणे : 'बजारहाट' ह्या कवितेत कवी भुजंग मेश्राम आपला लिंगभाव स्त्रींच्या भाषेत व्यक्त करताना लिहितात,

" बजाराबद्दल तू आसी पुसते ये माय
जसं कही तुहं आताच झालं लगीन
न् ठावूक नोसाव बजारभाव
साईटवर बी तू लय पुस्ते माय खोदू खोदू
बजारात बायाच काहून जातेत ?
बजार कराले काय टोकलीच फायजे ?
खरं सांगू, माह्या सर्व्या रांडवला बजारसाटी
कोण हाये ? पोराले आणाव मन्लं
बजार दाक्वासाटी, त असी कोन्ची मजूरी ?'' (ऊलगुलान, पृ.क्र. २१)

कवितेच्या ओळीतून आलेला लिंगभाव हा अतिशय बोलका आहे कवी भुजंग मेश्राम आईच्या व मुलाच्या संभाषनातून आलेला लिंगभाव प्रकट करतात की,

साईटवर बी तू लय पुस्ते माय खोदू खोदू आणि मुलाचा प्रश्न, बाजारात बायाच काहून जातेत ? त्यावर आईचं सांगण, खरं सांगू, माह्या सर्व्या रांडवला बजारसाटी कोण हाये ? हे मुलाला दिलेल उत्तर स्त्रीचा लिंगभाव विशद करतो. पुढच्या कवितेत,

" बिजवाचं सोरलेलो
तेन् बोलावली छेरी. सम्दे चिडीचुप्प.
हात दाकवाच्या आंदीन थेनं सुरू केलं संपासप
ओरल्लो, मेलो तू मोलो, चोलण्यात मुतलो,

छेरीसाटी मेंदीचा उपटा-कुपाटा
मातर वाजोनार नाई बाजा !
काय उपटसाल उपटून माहा... '' (ऊलगुलान, पृ.क्र. ९५)

वरील ओळी ह्या कवी भुजंग मेश्राम यांच्या आश्रम शाळेतील कविता त्यातील 'तानाजी सिडाम' कवितेच्या आहेत यात कवितेचा अर्थ हा अतिशय मार्मिक आणि बोलका आहे. त्यात शालेय जीवनात १५ ऑगस्ट चा कार्यक्रम असतो आणि कार्यक्रम म्हटलं की वाजवणं आलं त्यामुळे कवींच्या वर्गमित्रापैकी कुणी तरी सांगतो की भुजंग आपलं पारंपरिक साधणं वाजवतो तो अभिप्राय सांगताना 'मास्ताराले कोणतरी लावली गा कारी' हा लिंगभाव. भुजंग मेश्राम सांगतात बिजवायचं सोडल आम्ही, त्यावर सर्व विद्यार्थ्यांची बळजबरी आणि मास्तराचा धाक, आणुकारं छेरी ! यावर कवीचा आपल्या बोली भाषेत दिलेला लिंगभाव अर्थातच आदिवासींच्या सणोत्सव, श्रध्दा, अंधश्रध्दा, वारापानांची गाणी, ढोल ताश्यांवर रिला रो... ही आदिम जीवनशैली यातून लोकमान्य लोकतत्वीय धारणा दिसून येतात. याप्रमाणेच आदिवासी कवियित्री ऊषाकिरण आत्राम आपल्या 'म्होरकी ' या काव्यसंग्रहात 'मातृत्व' ह्या कवितेत लिहतात,

" आये सये सुको बये, आस्ते आस्ते चालं
माझ्या पोटुशीचं बारं, पाहे फिरत वर खालं
पाहे भिजली कंचुकी, पान्हा फुटला येगानं
कसं थोपवून धरू... पुढं घनदाट येरू...
आये फिरते ये लई, आईकुं लावूनशान कानं
माह्या बेंबीच्या खालतं, मले वाटले कुरबुरं
नाय चालणे होयाचे, पाट फुटले रक्ताचे
जिव लईच तगमगे, सये फिर फिर मागे
तवा बसली सायेत, पोट धरून हातात
कळ दाबते वटांत, बार जन्मलं... रानांत.'' (म्होरकी पृ.क्र. ४६)

ही कविता संबंध मानवीय स्त्रीच्या जीवनातल अंतिम सत्य आहे. स्त्री ही गरीब असो वा श्रीमंत पण जनन क्रियेच्या वेदना या सारख्याचं फरक एवढाच की, इतरांच्या आणि आदिवासींच्या जीवनातील भौतिक सुविधांचा लाभ हा समसमान नाही म्हणून कवियित्री आपल्या आदिवासी स्त्रींच्या वाट्याला येणाऱ्या यातना आणि बाळाच्या जन्माच अगतिक वर्णन हे वास्तवाच्या पलीकडे जाऊन, आंतरीची आर्त हाक घेऊन आई विषयीचा जिव्हाळा कवितेच्या माध्यमातून व्यक्त करतात.

" जेव्हा तेव्हा त्याच्या लाथा हाणणं
आणि अंगावर खायला ऊठणं
आपणही सवयींन "मुर्दा'' सारखे
सारेच शोषीत पचवित गेलो 'कडू बेणे' '' (म्होरकी पृ.क्र. ५४)

स्त्रीच्या वाट्याला आलेला प्रापंचिक आघात हा 'म्होरकी' या काव्यसंग्रहातील मुक वेदनेचा "जाहीरनामा'' या कवितेत मांडताना पुरूषप्रधान संस्कृतीत आदिवासी स्त्री सुध्दा सुटली नाही नवरा बायकोच्या संसारामध्ये जो वास्तविक अत्याचार होत असतो तो अत्याचार स्त्री ही निमूटपणे सहन करते, त्यावर ह्या पुरूषप्रधान संस्कृतीला आव्हान म्हणून व स्त्रीच्या वाट्याला येणारा अनुभव त्या विद्रोहाच्या भाषेत सर्व स्त्री व पुरूष जातीला सजग करण्यासाठी आपल्या कवितेच्या माध्यमातून मुकवेदनेच्या जाहीरनात्यातून स्त्रीला शोषित न राहता मुर्दा सारखं जीवन व्यतित न करता एक सशक्त आणि सक्षम होण्याचा इशारा देतात.

" घन गर्जत आला काळ
दाटला बहू अंधार
चहू दिशांत फिरती घुबडे
सांभाळ मुली तू तोल
मी माय तुझी धैर्याची

खचली कधीच नाही
अनीती वेढली जगाला
बापाचा भरोसा नाही.'' (रानआसवांचे तळे पृ.क्र. ७८)

कवियित्री सौ. कुसूम अलाम आपल्या रानआसवांचे तळे काव्यसंग्रहातील 'पोरी जरा जपून' या कवितेत आदिमांच्या जीवनात स्त्री ही अबला आहे. तीला शुरविरांचा इतिहास असला तरी या आधुनिक युगात व्याभिचार, स्वैराचार, भ्रष्टाचार बोकाळला आहे. या मानविय संस्कृतीत ती सुरक्षित नाही तिच्यावर कधी कुठला प्रसंग ओढावेल हे सांगता येत नाही. म्हणून उपवर झालेल्या आपल्या मुलीला सजग करताना लचके तोडणाऱ्या घुबडांपासुन सावध करते मी माय तुझ्या पाठीशी आहे, कारण गरिबीने लाचार झालेल्या तुझ्या बापाचा भरोसा नाही. हा जो वास्तविक जिवनातील आदिवासींच्या बाबतीचा अनुभव सौ. कुसूम अलाम यांनी आपल्या कवितेतून दिला आहे. तो मनाला विचार करायला लावणारा आहे.

" अयं मना पाय चेपी दे न जराक '
कन्हारता जाईन-
तो तीनी घरवालीला आखं
'घर झाडाना, पाणी भराना न्हवू देवू ?'
कटाईत बायको उत्तर देनी,
'अय, ताबी करजी नं..., पन...'
किंवा
' अथीच पाय चेपत बठू !'
दु:खाला धरीन बठसून त
खासूत काय ?'' (गोधड पृ.क्र. ५९)

कवी वाहरू सोनवणे यांच्या 'गोधड' काव्यसंग्रहातील 'दु:ख' या भिलोरी कवितेचा मतितार्थ आहे की, अगं माझे पाय चेपून दे नं जरा नवरा कव्हत बायकोला म्हणतो बायको त्यावर उत्तर देते की, केर काढणं, पाणी भरणं राहू देऊ? कंटाळून बायको उत्तरते ! अगं तेही कर नं... पण... बायको पुढ म्हणते. इथेच पाय चेपंत बसू ! दु:खाला धरून बसलो तर खाणार काय ? हा जीवनाचा संघर्ष मांडते उपरोक्त कवितेत कवींनी स्त्री-पुरूषाचा लिंगभाव हा अतिशय मार्मिक शब्दात मांडला आहे. पुरूषांनी स्त्रीला सांगावयाचा अधिकार व स्त्रीची पुरूष संस्कृतिला दिलेली हाक आणि पुरूषाच्या विषयीचा लिंगभाव हा आदिवासींच्या जीवन संघर्षाचा लेखा-जोखा स्पष्ट करतो.

एकंदरीतच मराठी आदिवासी कवितेतून व्यक्त होणारे लोकतत्वीय लिंगभाव विषयक तत्वज्ञान वरिल आदिवासी साहित्यात त्यांच्या कवितेत आहे. मुळात आदिवासींची संस्कृती ही निसर्गाच्या सानिध्यात नांदणारी आहे. घनदाट अरण्याशी या संस्कृतीची नाळ जुळलेली आहे. त्यांच्या विविध परंपरा, दैवत, धर्मविधी, लोकगिते आणि लोककथा या प्रगल्भ आहेत. आधुनिक भारतात वेगवेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक चळवळी उदयास आल्या, पण आदिवासींच्या बाबतीत या चळवळींचा किती उपयोग झाला ही चिंतनीय बाब आहे. आदिवासींचे राहणीमान त्यांच्या धारणा त्यावर अधारित कामधंदे, दीनचर्या या विषयी आदिवासीचा लिंगभाव त्यांचे साहित्य आणि संस्कृतीयामध्ये स्पष्ट आहे.

**संदर्भसूची :**

१. 'ऊलगुलान' - भुजंग मेश्राम (पृ.क्र. २१)
२. तत्रैव (पृ.क्र. ९५)
३. 'म्होरकी' ऊषाकिरण आत्राम (पृ.क्र. ४६)
४. तत्रैव (पृ.क्र. ५६)
५. 'रानआसवांचे तळे' - सौ. कुसूम अलाम (पृ.क्र. ७८)
६. 'गोधड' - वाहरू सोनवणे (पृ.क्र. ५९)